**राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजनेअंतर्गत शासकीय जमीन चारा / बांबू पीकासाठी भाडेपट्ट्याने देण्याच्या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय समिती स्थापन करणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: जमीन-२०२५/प्र.क्र.२११/जमीन-०१**
**मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक:- ३१ जुलै, २०२६**

**वाचा:-** महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांकः जमीन-२०२५/प्र.क्र.२६७/जमीन-०१ (ई- १२७५२४०), दिनांक १९ जून, २०२६ व शासन समक्रमांकाचे दि.०९.०७.२०२६ चे शुध्दिपत्रक.

**प्रस्तावना:-**

राज्यातील पशुधनासाठी टंचाई कालावधीत व इतर वेळीही चाऱ्याचा अपुरा पुरवठा होत असल्याने, शासकीय पड जमिनींवर चारा / बांबू उत्पादन घेण्याबाबत शासनाने दि.१९ जून, २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये धोरण निश्चित केले आहे. नोंदणीकृत पात्र महिला, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा महिलांचा बचत गट, उमेद/माविम अंतर्गत येणारे महिला बचत गट, महिला सेवा सहकारी संस्था तसेच ग्रामसंघ यांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजनेअंतर्गत शासकीय जमिनी भाडेपट्ट्याने वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेच्या संनियंत्रणासाठी तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. तथापि, या संपूर्ण योजनेवर राज्यस्तरावरून संनियंत्रण ठेवण्यासाठी व धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मा. मंत्री (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजनेची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी व योजनेचे संनियंत्रण करण्यासाठी मा. मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे "राज्यस्तरीय समिती" गठीत करण्यात येत आहे:-

१) **राज्यस्तरीय समितीची रचना:-**

| **अ.क्र.** | **पदनाम/सदस्य** | **समितीमधील पद** |
|---|---|---|
| १. | मा. मंत्री (महसूल) | अध्यक्ष |
| २. | विधानसभा / विधानपरिषद महिला सदस्य | ११ सदस्य |
| ३. | प्रत्येक महसूली विभागातील २ याप्रमाणे मा. मंत्री(महसूल) यांनी नामनिर्देशित केलेल्या १२ अशासकीय महिला सदस्य | १२ सदस्य |
| ४. | अ.मु.स. (महसूल) | सदस्य सचिव |

**२) समितीची कार्यकक्षा (Terms of Reference):**

१. राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजनेअंतर्गत शासकीय जमिनी भाडेपट्ट्याने देण्याच्या कार्यवाहीचा दर ३ महिन्यांनी राज्यस्तरावर आढावा घेणे.

२. जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) यांच्यामार्फत राबविण्यात येत असलेल्या जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय समित्यांच्या कामकाजाचे संनियंत्रण करणे.

३. योजनेच्या अंमलबजावणीमध्ये येणाऱ्या प्रशासकीय व धोरणात्मक अडचणींचे निराकरण करणे.

४. चारा, बांबू, नर्सरी व अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतांसाठी आवश्यक असणाऱ्या कच्च्या मालाच्या उत्पादनासाठी आवश्यकतेनुसार धोरणात सुधारणा सुचविणे.

५. समितीची बैठक आवश्यकतेनुसार मा. अध्यक्षांच्या मान्यतेने आयोजित करण्यात येईल.

०२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७३११८२६०६०२४८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY AUDUMBAR DHARURKAR

Digitally signed by SANJAY AUDUMBAR DHARURKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forest Department,
2.5.4.20=637145FD393D6D5C713E94E6DA7BC6BEE23011448B7FC64D138630B9C76AE7A2, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=FCF7172A73579B34FA622983D8FB647780FBEF1D35A1CA975955EB9193F3F800, cn=SANJAY AUDUMBAR DHARURKAR
Date: 2026.07.31 18:26:50 +05'30'

**(संजय धारुरकर)**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.

२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास विभाग) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

४) मा. उपमुख्यमंत्री (क्रिडा व युवक कल्याण, राज्य उत्पादन शुल्क) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

५) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

६) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

७) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

८) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/ नागपूर

१०) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/ नागपूर

११) जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख,

१२) नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१३) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.

१४) सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग.

१५) सर्व विभागीय आयुक्त.

१६) सर्व जिल्हाधिकारी.

१७) सर्व सह सचिव / उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

१८) निवड नस्ती (जमीन-१)